# राज्य माहिती आयोग,अमरावती खंडपीठ

व्दितीय अपील क्रमांक ७७६/२०१२ आणि तक्रार क्रमांक ८२/२०१४ याबाबत

**आदेश भंग तक्रार क्रमांक १२०१/२०१९, १७०/२०२०, ३२८३/२०२०, १८४०/२०२१ आणि १/२०२२**

भिमसागर आत्माराम इंगळे,
मु.पो.काजळेश्वर, ता.बार्शीटाकळी,
जि.अकोला

**अर्जदार**

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य, गुलाब नबी आझाद कनिष्ठ महाविद्यालय,
बार्शीटाकळी, ता.बार्शीटाकळी,
जि.अकोला

**उत्तरवादी**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, अकोला,
जि.अकोला

सुनावणी सूचना (नोटिस) दिनांकः ०२.०२.२०२२

**दिनांक २२.०२.२०२२ रोजी उपस्थित पक्षः**

| | नांव | व्यक्तीशः / प्रतिनिधी |
|---|---|---|
| अर्जदार | भिमसागर आत्माराम इंगळे | हजर |
| ज.मा.अ. | नंदकुमार नथ्थुजी राऊत | व्यक्तीशः |
| ज.मा.अ. तर्फे वकील | ॲड.राजेंद्र पांडे | प्रतिनिधी, वकिलपत्र दि.२२.०२.२०२२ |
| प्र.अ.अ. यांचे वतीने | एस.के.आसलकर, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, सहसंचालक उच्च शिक्षण, अमरावती विभाग | व्यक्तीशः |

लघुरुपेः जन माहिती अधिकारी करिता 'ज.मा.अ.' तसेच प्रथम अपिलीय अधिकारी करिता 'प्र.अ.अ.'

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय अमरावती विभाग, अमरावती सत्यमेव जयते

राज्य माहिती आयुक्तः डॉ. विनय कुमार सिन्हा

दिनांकः **२२.०२.२०२२२**

## आदेश

१. अर्जदार यांनी त्यांचे माहितीचा अर्जावर समाधानकारक प्रतिसाद मिळविण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली दाखल केलेले अपील व संबंधीत तक्रार अर्जावर आयोगाचे पुर्वी देण्यात आलेल्या आदेशाचे अनुपालन बाबत सुनावणी करण्याचे ठरविले.

२. अर्जदार यांनी त्यांचे दि. १६.१२.२०११ रोजी माहितीचा अर्जाबाबत दाखल केलेले द्वितीय अपील अर्ज क्र. ७७६/२०१२ वर आयोगांनी दि.१२.१२.२०१३ व १७.०४.२०१४ रोजी आदेश पारित केले. आयोगाचे आदेशाप्रमाणे ज.मा.अ. यांनी माहिती पुरविले नाही, असे तक्रार करुन अर्जदारांनी आयोग कार्यालयास खालील प्रमाणे तक्रार अर्ज दाखल केले आहेः

| तक्रार क्रमांक | दाखल दिनांक | शेरा |
|---|---|---|
| ८२ | ०६.०२.२०१४ | तक्रार अर्जावर स्मरण पत्र ०१.०३.२०१७, ०१.०८.२०१७, १०.०४.२०१८, व ०३.०९.२०१८;<br>सुनावणी तारखा १५.०२.२०१८, १०.०४.२०१८, ०८.०६.२०१८ व ०३.०९.२०१८;<br>**आयोगाचा आदेश दि.०३.०९.२०१८** |
| १२०१ | ०६.०६.२०१९ | राज्य माहिती आयोग, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व महाविद्यालय यांचेवर संगमनत करण्याचा आरोप;<br>आयोगाचे अधिकारी देविसिंग डावेराव यांचे विरुद्ध तक्रार |
| १७० | २१.०९.२०२० | तक्रार अर्जावर स्मरण पत्र १५.१०.२०२० |
| ३२८३ | २३.११.२०२० | आयोगाचे अधिकारी देविसिंग डावेराव, गणेश काठाळे व प्रज्ञा मनोहर यांचे विरुद्ध तक्रार व चौकशीची मागणी |
| १८४० | ०२.०७.२०२१ | आयोगाचे अधिकारी देविसिंग डावेराव व प्रज्ञा मनोहर यांचे विरुद्ध तक्रार<br>दि.१०.०८.२०२१ पासून आयोग कार्यालय समोर तीन दिवस धरने आंदोलन करणेबाबत निवेदन; दि.९.८.२०२१ चे प्रकृती ठीक नसल्याने आंदोलन ला बसणार नसल्याचे पत्र |
| १ | ११.०१.२०२२ | बेमुदत साखळी उपोषण बाबत दि.०६.०१.२०२२ चे निवेदन |